प्रेस नोट दिनांक – १६/१०/२०१८

## पोलीस कल्याण संकुल, शिवाजीनगर पुणे येथे उभारण्यात आलेल्या सायबर पोलीस ठाण्याच्या कार्यालयाचे मा. पोलीस आयुक्त, पुणे शहर यांच्या हस्ते उद्घाटन

पुणे शहरात घडणाऱ्या वाढत्या सायबर गुन्ह्यांना आळा घालण्यासाठी व तात्काळ कार्यवाहीसाठी पोलीस आयुक्त कार्यालयाच्या टेरेसवरील सायबर सेलचे कार्यालय अपुरे पडत होते. तसेच जेष्ठ नागरीक व विकलांग व्यक्तींना आयुक्तालयाच्या टेरीसवर जावुन तक्रार करणे शक्य होत नव्हते. त्यासाठी कोठेतरी तळमजल्यावर सुसज्य व मोठया जागेची आवश्यकता होती. मा. पोलीस आयुक्त श्री. व्यंकटेशम यांच्या सुचनेनुसार सायबर क्राईम सेल, गुन्हे शाखा, पुणे शहर हे कार्यालय पोलीस कल्याण संकुल, पोलीस मुख्यालय, शिवाजीनगर, पुणे येथील पुर्वीची सायबर लॅब असलेल्या सुसज्य इमारतीत नागरीकांच्या सोयीसाठी स्थलांतरीत करण्यात आले आहे व त्यास पोलीस ठाण्याचा दर्जा देण्यात आला आहे.

आज दि.१६/१०/२०१८ रोजी सायबर पोलीस ठाण्याच्या नुतन कार्यालयाचे मा. पोलीस आयुक्त, श्री. व्यंकटेशम यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले. सदर उद्घाटनावेळी श्री. शिवाजी बोडखे, पोलीस सह आयुक्त, पुणे शहर, श्री. प्रदिप देशपांडे, अतिरीक्त पोलीस आयुक्त, गुन्हे, श्री. रविंद्र शेनगावकर, अतिरीक्त पोलीस आयुक्त, श्री. साहेबराव पाटील, अतिरीक्त पोलीस आयुक्त, श्री. सुनिल फुलारी, अतिरीक्त पोलीस आयुक्त,.. सर्व पोलीस उप-आयुक्त, इतर पोलीस अधिकारी, कर्मचारी, पोलीस मित्र, पत्रकार व इतर मान्यवर उपस्थित होते. सायबर पोलीस ठाण्याचे नवीन कार्यालय हे मध्यवर्ती ठिकाणी असुन सदरची इमारत सुसज्य व आधुनिक पध्दतीची असल्यामुळे येणाऱ्या तक्रारदारांसाठी सोयीची आहे. सायबर पोलीस ठाण्याच्या नवीन कार्यालयाचा दुरध्वनी क्रमांक ०२०(२९७१००९७) असा आहे.



PUNE CITY CYBE  ICE STATION
At the auspici  ands of
Dr. Shri. K. Venk  sham, IPS
Commissioner of P  Pune City
In the presence of
Shri. Shivaji Bodakhe, IPS
Jt. Commissioner of Police, Pune City
On Tuesday, 16th October 2018
Shri. Pradip Deshpande, IPS
Addl. Commissioner of Police
Crime, Pune City
Smt. Jyoti Priya Singh, IPS
Dy. Commissioner of Police
EOW & Cyber, Pune City
Smt. Swapna Gore
Dy. Commissioner of Police
H.Q., Pune City
I.P.S.


